दैनिक

# महावृत्त

Email : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते Mo. 9421094991, 7264079990






लातूर | वर्ष : ०३ रे | अंक : २७९ वा | रविवार, दि. १४ एप्रिल २०२४ | पृष्ठ - ८ | स्वागत मुल्य ५ रू.










## संपादकीय....

# फक्त जयभीम बोलणे अंबोडकरवाद नव्हे

जस जशी भिम जयंती जवळ येते तस तशे काही लोकांच्या अंगात आंबेडकरवाद घुसायला सुरवात होते. आंबेडकरवाद म्हणजे जोरजोरात जयभीम बोलणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती ला दारु ढोसुन नाचणे नव्हणे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती कार्यक्रमावर निरर्थक खर्च करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंतीच्या नावाखाली पैशाची उधळपट्टी आणि विचाराचे हनन नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे मोठ मोठे बॅनर लाऊन दिखावा करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती कार्यक्रमाला हजार पाचशे रुपये देऊन तोऱ्यात मिरवणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती कार्यक्रमात वर्गणीच्या नावाखाली खंडणी वसुल करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे स्वतः ची दुकानदारी थाटून तडजोड करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे ज्याची कुवत नसताना ही त्याच्या कडून वर्गणीच्या नावाखाली सक्तीने पैसे गोळा करणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे एखाद्याने नाचगाणे आणि निव्वळ मनोरंजनासाठी पैसे दिले नाही म्हणून त्याला चुकीचे बोलणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे दारू पिऊन नशापान करणाऱ्या लोकांच्या हाती कार्यक्रमाचे सुत्र देणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे लोकांना लुबाडून, नैतिकता कमी करून जयंती कार्यक्रमात मिरवणे नव्हे, आंबेडकरवाद म्हणजे जयंती ला नाचणे आणि महापरिनिर्वाण दिनी रडणे मुळीच नव्हे. आंबेडकरवाद म्हणजे स्वाभिमान, आंबेडकरवाद म्हणजे एकी, आंबेडकरवाद म्हणजे ज्ञान, आंबेडकरवाद म्हणजे संस्कार, आंबेडकरवाद म्हणजे शिस्त, आंबेडकरवाद म्हणजे सामाजिक न्याय, आंबेडकरवाद म्हणजे जागृती, आंबेडकरवाद म्हणजे एकमेकांना गरजेनुसार मदत, आंबेडकरवाद म्हणजे मानवता, आंबेडकरवाद म्हणजे आदर्श जिवन जगण्याची सर्वोच्च प्रेरणा, आंबेडकरवाद म्हणजे एकी, आंबेडकरवाद म्हणजे न्यायासाठी सामुहीक व प्रामाणिक संघर्ष, आंबेडकरवाद म्हणजे तडजोड न करता उभा केलेला सामाजिक लढा होय. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीने, विचार व कार्याने करोडो लोकांचे उत्थान करून देशाला मजबूत करण्याचे काम केले. देशाच्या व व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार यांच्या शिवाय दुसरा पर्यायच नाही. जगाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे ज्ञान, कार्य व विचार याची दखल घेऊन जागतिक पातळीवर वेगवेगळ्या माध्यमातून गौरव केला आजही गौरव होत आहे. परंतु भारतातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या यांचे कार्य विचार व चळवळ यांच्या विषयी लोक गंभीर नाहीत हेच दिसून येते. प्रस्थापितांची व्यवस्था मोडीत काढून सर्वसामान्य लोकांना देशाचे मालक बनवून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जागतिक क्रांती केली. प्रस्थापित लोक सर्वसामान्य लोकांना गुलाम, लाचार, तुच्छ समजून ते शिक्षण,नोकरी व हक्क अधिकार यांच्या लायकीचेच नसल्याने पुर्वी पासून यापासून दुर तर ठेवलेच परंतु माणसाने माणसाजवळ येऊच नये याची पुर्ण व्यवस्था केली करून स्वतः लाच श्रेष्ठ समजणारे निच लोकांनी सामाजिक व धार्मिक अराजकता निर्माण केली होती. या लोकांची व्यवस्था उद्धवस्त करण्याचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. म्हणुन ह्या लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य मान्य कसे होईल म्हणून या लोकांनी सुरवाती पासून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याविरोधात काम करायला सुरवात केली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा, कार्याचा व विचाराचा फायदा झालेल्या नव्वद टक्के लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेण्याचा प्रयत्नच केला नाही या वरून लोकांची बौद्धिक बेइमानी दिसून येते. परंतु जातीच्या नावाखाली व धम्माच्या नावाखाली ज्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेतले तेही लोक आंबेडकरवादी बनलेच असे मुळीच नाही. आज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनावर, कार्यावर व विचारावर लाखो लेखक, वक्ते व गायक तयार झाले यापैकी खरचं विचार केला तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे कीती हा प्रश्न स्वतः च स्वतःच्या मनाला विचारला तर आपल्या समोर किती लोकांची यादी येईल हा चिंतेचा विषय आहे. गायक, लेखक व वक्ते फक्त पैसा मिळतो म्हणून विचार सांगत असतील तर खरंच ते विचाराचे असतील का? सुपारी मिळते म्हणून चळवळ आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर सांगणारे लोक कधीच विचाराचे होऊ शकत नाहीत. अनेक गायक, लेखक व वक्ते असुनही यामध्ये ही अनेक लोकांचे एमेकांसोबत पटत नाही. जर सर्व जन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन काम करत असतील, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व विचाराचा सर्वांना सारखाच फायदा व संधी निर्माण झाली असेल तर त्यांच्या च विचाराचे काम करताना वैयक्तिक मतभेद होण्याचे काय कारण? जर वैयक्तिक मतभेद होत असतील तर ते विचाराचे किंवा आंबेडकरवादी आहेत असे कसे म्हणता येईल? राजकीय परिस्थिती कशी आहे याबद्दल तर सर्वांना च माहिती आहे. स्वतः चे पोटभरण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव व चळवळ यांना भांडवल बनवून लोकांना मुर्ख समजून स्वतः चे दुकान थाटने यालाच आज नेता असे म्हणतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः ची मुले, स्वतः ची संपती, स्वतः चे सुख, स्वतः चे ज्ञान, स्वतः चे शिक्षण समाजासाठी खर्च करून गुलामांना राजा बनवले, बेघरांना बंगल्याचे मालक बनवले. शिक्षणाच्या माध्यमातून अधिकारी बनवले. डॉ बाबासाहेब आंबेडकर एकटे होते तरीही करोडो लोकांच्या जिवनात क्रांतीकारी परिवर्तन केले. आज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन स्वतः ला नेते समजणारे लाखों आहेत परंतु ते स्वतः च्या ही समस्या सोडवू शकत नाहीत याचे एकमेव कारण म्हणजे आज लोकांमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार नाहीत, मनामध्ये प्रामाणिकपणा नाही, स्वाभिमान गहाण टाकून इतरांची हुजरेगिरी आणि लाचारी करणाऱ्यांना समाजाचे काही घेणे देणे नाही, वर्तनात विचार नसल्याने स्वतः ची झोळी भरण्यासाठी हे कोणाच्या ही पायावर लोटांगण घेऊन लाचारी इमानदारीने करू शकतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीमुळे, कार्यामुळे आज अनेक विद्वान, अभ्यासु व परिवर्तनाची तळमळ असले अनेक लोक तयार झाले ही वस्तुस्थिती कोणीही नाकारू शकत नाही. परंतु जर विद्वान, अभ्यासु आणि परिवर्तनाची तळमळ असलेले लोकच कधीच एकत्र येत नसतील, नियोजन करत नसतील, वैयक्तिक मतभेद विसरून वैचारिक मुद्यावर एकत्र बसून चर्चा करत नसतील, सामाजिक समस्या व प्रबोधन करण्यासाठी विना नेतृत्व विना जाहिरात समोर येत नसतील तर त्यांचा अभ्यास, विद्वत्ता व तळमळ कोणाच्या कामाची?

# लोकसभा निवडणूक आणि आंबेडकरी विचारधारेची १३३ वी भिम जयंती

लोकसभा निवडणूक दर पाच वर्षाने येत असते.आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भिमजयंती मात्र दरवर्षी येत असते. निवडणुकीत एकच दिवस मतदान प्रक्रिया सकाळी ७ ते ५ वाजे पर्यंत असते.त्याचं दिवशी तुम्ही राजे असता. दुसऱ्या दिवशी तुमची किंमत शुन्य होऊन जाते. पण त्या एका दिवसाचे परिणाम पांच वर्षचं नव्हे तर कायम स्वरुपी इतिहास घडवून जातात. काही घटना निकाल प्रेरणादायी लक्षवेधी असतात. तर काही कायमची जखम देऊन जातात.मग दर पांच वर्षाने आपली आपल्यालाच जाणीव करून देते.मग आजची तरुण पिढी विचारते बाबा आज आपण १३३ वी जयंती करतो.त्याच बरोबर १८ व्या लोकसभेची निवडणुकीला सामोरे जातो. ५४३ सदस्य निवडण्यासाठी भारतात १९ एप्रिल २०२४ ते १ जून २०२४ या कालावधीत सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. निवडणुका सात टप्प्यांत होतील आणि ४ जून २०२४ रोजी निकाल जाहीर केले जातील.त्यात आपण आपला पक्ष कुठे असेल?.

बाराही महीने ३६५ दिवस आपण बाबा के सन्मान मे हम मैदान मे. म्हणत असतो. दररोज कुठे ना कुठे अन्याय अत्याचार,हत्याकांड होत असतात. त्या विरोधात आपण निष्टने जन आंदोलने करीत असतो. त्यात खरी निष्टा किती असते हा संशोधनाचा प्रश्न आहे.सामाजिक आंदोलनासाठी निष्ठेची खूप गरज असते. निष्ठेशिवाय कोणतेही आंदोलन चालविणे किंवा ते यशस्वी करणे शक्य नसते. जर तुम्ही आंदोलन उभे करायचे ठरविले असेल तर निष्ठेची खूप गरजची असते.निष्ठेचा काय अर्थ आहे जे स्वप्न घेऊन तुम्ही पुढे चालत आहात त्या स्वप्नाला पूर्ण करण्यासाठी जे काम तुम्ही सुरु करता त्या कामाला आचार विचार करून स्वीकार केले पाहिजे.आणि जर विचार करून स्वीकार केले असेल तर जीवनभर ते पूर्ण करण्यासाठी ते निभवाल तर तुम्हाला निष्ठावान आहेत आणि आणि या कामाला पूर्ण करण्यासाठी तुम्ही जीवनभर कष्ट केले असे म्हणता येते.

राज्यात देशात हजारो जन आंदोलन चालवली जातात. पण त्यात निष्टा असते काय की राजकारणासाठी ते आवश्यकता असते. पण कधी ही आंदोलन फक्त निष्ठेच्या विश्वासावर चालत नाही. त्यासाठी बुद्धीची पण गरज असते.असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की मला निष्ठावान लोक पाहिजेत,बुद्धीची भरपाई मी करेन. बुद्धीला बाबासाहेबांनी दुसऱ्या स्थानावर ठेवले. निष्ठा नाही आणि केवळ बुद्धी आहे तर खूप भयावह आहे.कारण जे बुद्धिवान आहेत त्यांच्याजवळ निष्ठा नाही,असे लोक समाजाला विकण्याचे काम करतील.भारतात शोषितांच्या वंचितांच्या मानसन्मानसाठी न्याय हक्क व प्रतिष्ठे साठी झटणारा आणि संघर्ष करणारा एकच नेता होऊन गेला त्यांचे नांव डॉ.बाबासाहेब आंबेडकर.त्यांच्या जीवनात त्यांनी जेवढा अन्याय अत्याचार आणि अपमान सहन केला,तेवढा आज कोणीच सहन करू शकत नाही.तरी त्यांनी कधीच हार मानली नाही किंवा संघर्ष टाळला नाही. उपाशी अर्धपोटी राहून त्यांनी अभ्यास केला शिक्षण पूर्ण केले.पण नोकरी शोधली नाही.समाजासाठी संस्था,संघटना आणि पक्ष स्थापन केला.परंतु आज त्यांच्या सर्व संस्था,संघटना आणि पक्ष क्रांतिकारी विचारधारे पासुन कोसो दूर गेल्या आहेत.आणि श्रेष्ठ कोण व्यक्ती



की संघटना यात अडकल्या आहेत. त्यांची १३३ वी जयंती आपण साजरी करीत आहोत.आज कितीही गंभीर समस्या आल्या तरी आपल्यातील अहंकार काही कमी होताना दिसत नाही.मात्र भिम जयंती साजरी करण्यासाठी सर्वच तन,मन,धनाने एकत्र येऊन उत्स्पुर्तपणे जोश मध्ये जयंती साजरी करतो.ती लक्षवेधी असते.भव्य मिरवणुकीचे विसर्जन झाल्यावर आणि आंबेडकरी जयंती संपल्यावर आंबेडकरी विचारधारा आणि भिम जयंतीचे नातं काही केल्या जुळत नाही.

नेत्याला आपल्या कर्तृत्वावर आत्मविश्वास असावा लागतो.त्यासाठी गांव पातळीवर संघटना बांधणी असावी लागते.पण गांव तालुका,जिल्हा पातळीवर संघटना बांधणी नसताना आपल्याच कर्तुत्ववावर आपला आत्मविश्वास ठेऊन ते नेते आणि कार्यकर्ते आयुष्यात चळवळीला दिशा देऊ शकत नाही. सर्व समाजाला एकत्र करण्याचा त्यांचा प्रयत्न चांगला असला.तरी स्वतःच्या समाजातील गटबाजी कायमस्वरूपी ठेऊन इतर समाजा कडून अपेक्षा करणे चुकीचे आहे.संपूर्ण देशात व महाराष्ट्रात वातावरण प्रचंड असंतोषाचे विशेष मागासवर्गीय समाजाबाबत असतांना आपण एकजूट झालो नाही तर २०२४ ला कसे सामोरे जाणार?. याचा गांभियाने विचार आजच केला पाहिजे.नंतर वेळ निघून जाईल.भिम जयंती साजरी करण्यासाठी सर्वच तन, मन, धनाने एकत्र येऊन उत्स्पुर्तपणे जोश मध्ये जयंती साजरी करतो. ती लक्षवेधी असते. पुढे काय?.

ग्रामीण भागातील समस्या गावात राहून सोडायच्या असतात.रोजीरोटी,उद्योग धंदे यांना स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाठबळ लागत असते.तिथे कामगार कर्मचारी अधिकारी सरकारी निमसरकारी संघटितपणे संघटने सोबत काम करीत असतात. त्यांचे उत्तम उदाहरण खैरलांजी हत्याकांड नंतरचे प्रशासकीय यंत्रणेतील कर्मचारी आणि अधिकारी मागासवर्गीय असूनही राजकीय दबावाखाली त्यांनी योग्य काम केले. त्या हत्यांकडातील राजकिय आशीर्वाद देणारे नेते तेव्हा पासुन विजय होत आहेत. त्यांनी पक्ष बदला तरी काही फरक पडत नाही.ते एकमेकांचे मावस भाऊ,आत्या भाऊ, सगे सोयरे आहेत.त्यामुळे त्यांचे संघटन गांव पातळीवर आहे.हे आपण विसरतो. मागासवर्गीय समाजाच्या लोकसंख्येवर मतदानावर सर्व नेते हक्क सांगतात. पण त्यासाठी गांव पातळीवर कोणते काम करतात हे सांगत नाही.

संत तुकडोजी महाराज यांनी ग्राम गिता या ग्रंथात दोन ओळीत संघटनेचे महत्व व्यापकतेने विषद केले आहे.ते म्हणतात,हत्तीस आवरी गवती दोर ! मुंग्याही सर्पास करती जर्जर !! रानकुत्रे संघटोनी हुशार ! व्याघ्रसिंहासी फाडती !!. हे मी कुठे वाचले नाही.लाखनी,अडयाल पवनी येथे ७८ वर्षाच्या जेष्ठ पत्रकार,अभ्यासक,यांच्या घरी व भंडारा येथे महसूल विभाग कॅन्टीनमध्ये चार जेष्टनेत्याच्या तोंडून ऐकले आहे.ज्यांनी बॅरिस्टर खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनाखाली १९७८ ला जिल्हा परिषद अध्यक्ष व सभापती पद भोगून वीस वर्षाचा मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीसाठी विविध प्रकारच्या निधीचा वापर कसा झाला. मागासवर्गीय समाजाच्या सरकारी नोकरीतील जागा ग्रामसेवक, शिक्षक,कोतवाल तहशिलदार ते जिल्हाधिकारी कसा भरल्या यांची तपशीलवार माहिती गोळा केली.त्यासाठी संघटना लागते. प्रत्येक क्षेत्रातील कामगार कर्मचारी अधिकारी आणि ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर हा त्या त्या पातळीवर संघटित असतो.यावरुन मानवाच्या जीवनात संघटनेचे महत्त्व किती मोठे आहे.हे आपण समजू शकतो.त्यासाठी आंबेडकरी विचारधारेची संस्था,संघटना आणि ट्रेंड युनियनची बांधणी आवश्यक आहे.त्यासाठी आपण एकत्र येत नाही. जय प्रमाणे भिम जयंती साजरी करण्यासाठी सर्वच तन, मन, धनाने एकत्र येऊन उत्स्पुर्तपणे जोश मध्ये जयंती साजरी करतो.ती लक्षवेधी असते.बाकी च्या समस्या बाबत काय?. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे असे म्हणतात. समाजात राहूनच मानवाचा सर्वांगीण विकास होत असतो.त्याच्या व्यक्तीमत्वाला विविध कंगोरे फुटून त्याचे व्यक्तिमत्त्व बहरत असते.जो माणूस समाजशील नसतो तो कितीही बुद्धिवान,पैसेवान असला तरी एका विशिष्ट मर्यादेच्या पलिकडे समाजाला त्याचा उपयोग होत नाही. म्हणूनच प्रत्येकाच्या जीवनात संघटनेचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे.जी जी व्यक्ती कोणत्या तरी संघटने सोबत जुळलेली असते. त्या त्या व्यक्तींना लोक ओळखत असतात. इतरांपेक्षा त्यांना जास्त मानसन्मान मिळत असतो. काही व्यक्ती संघटनेत खूप किर्याशील असतात. त्यांना जास्त प्रसिध्दी मिळते. संघटना जर काळानुरुप मोठी होत गेली, नावलौकीकास आली तर आपोआपच कार्यकर्त्यांचेही नाव व्हायला लागते. त्यांना प्रतिष्ठा,प्रसिद्धी,पद,पत,मिळायला लागते. काही कार्यकर्ताच्या डोक्यात मग या प्रसिद्धी व पैश्याची हवा चढायला लागते.ते स्वतःला संघटनेपेक्षा मोठे समजायला लागतात. त्यांच्यात प्रचंड अहंकार निर्माण होतो. माझ्या मुळेच ही संघटना आहे असे त्याला वाटू लागते. मीच या संघटनेला मोठे केले असा अहंगंड त्याच्यात निर्माण होतो. मग त्या व्यक्तीचे वागणे,बोलणे,चालणे पूर्णपणे बदलून जाते. ज्या कार्यकर्त्यांच्या प्रेमावर आणि श्रमावर तो मोठा झालेला असतो त्यांनाच तो तुच्छ समजायला लागतो. त्यांच्यासोबत बोलायला त्याला आता वेळ नसतो. त्यांचे फोन उचलण्यात त्याला कमीपणा वाटतो. आता त्याचे वागणूक रींर्ळीविश पूर्णतः बदललेले असतात.आणि इथूनच मग त्याच्या -हासाला सुरुवात होते. म्हणूनच आंबेडकरी विचारधारा आणि १३३ वी भिम जयंती यांचे नातं जुळतांना दिसत नाही. ते दिसायला हवे आहे.

जगातील कोणत्याही संघटनेच्या व कार्यकर्त्या बाबतीत हे असेच घडत असते. संघटनेत काही वक्ते,लेखक,प्रचारक असतात.त्यांच्या माध्यमातून संघटनेची ध्येयधोरणे लोकांपर्यंत पोहचवायची असतात. वक्ते, लेखक हे संघटनेचे वैभव असतात.परंतु सभासद संघटनेचा प्राण असतो,आत्मा असतो. त्यामुळे या मंडळीं पेक्षा कार्यकर्ता अत्यंत महत्वाचा असतो. म्हणून एखादा वक्ता किंवा लेखक याला विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त महत्व देवू नये.

सर्वांना महत्व दिल्या गेले पाहिजे. नाहीतर ही मंडळी डोक्यावर चढतात आणि स्वतःला संघटनेपेक्षा मोठी समजायला लागतात.त्याला जाहीर सभेच्या स्टेजवर सिंहासनच लागते. मग आता त्या व्यक्तीची महत्वाकांक्षा प्रचंड वाढायला लागते. तो आता मर्यादेच्या पलिकडेचे स्वप्न पाहतो आणि आता आपण या संघटनेतून बाहेर पडलो तर ही संघटनाच संपून जाईल असा त्याचा भ्रम होतो.मग तो संघटनेच्या विरुध्द कारवाया करायला लागतो. बोलायला लागतो.कार्यकर्ते फोडण्याचा प्रयत्न करतो. आणि संघटनेत फूट पाडण्याचा प्रयत्न करतो.परंतु सदस्य,सभासद हुशार आणि निष्ठावंत असल्यामुळे त्याच्या कारस्थानाला बळी पडत नाही. उलट कार्यकर्ते त्यालाच जाब विचारतात.संघटनेने मोठे केले नसते,तर तुला गावाच्या बाहेर कोणीही ओळखले नसते.असे त्याला अधिकारवाणीने सांगतात.आतापर्यंत सामान्य कार्यकर्त्यांच्या मनात त्याच्याबद्दल असलेली इज्जत झिरो होऊन जाते.मागे वळून पाहिल्यावर त्याच्यामागे कोणीच दिसत नाही. मग त्याचे डोळे उघडतात,पश्चात्ताप होतो, संघटनेचे महत्व समजते. आपल्यामुळे संघटना नाही तर संघटनेमुळे आपण होतो याची त्याला जाणीव होते. पण आता वेळ निघून गेलेली असते. काही क्षणासाठी मोठे लोक सोबत असतात, पण आपले संरक्षण करणारा, आपल्यासाठी जीव देणारा कोणीच जीवाभावाचा सामान्य कार्यकर्ता मात्र आपल्यासोबत नाही याची त्याला जाणीव झाल्यावर त्याची रात्रीची झोप हराम होवून जाते. तो एकाकी पडतो.पैसे कितीही मिळाले तरी कार्यकर्त्यांचे प्रेम आणि आपुलकी मात्र त्याला कधीच मिळू शकत नाही. पण जो कार्यकर्ता संघटनेसोबत प्रामाणिक असतो त्याला त्याचे फळ एक दिवस निश्चितच मिळते. फितुर म्हणून त्याला कोणीही हिणवत नाही. प्रामाणिक म्हणूनच सर्वजण त्याच्याकडे पाहतात.म्हणून कोणत्याही संघटनेत काम करणा-या कार्यकर्त्यांनी आपल्या संघटनेसोबत एकनिष्ठ राहावे. संघटनेत रुसवे, फुगवे, नाराजी, वादविवाद चालतच असतात.पण ज्या संघटनेमुळे आपल्याला सर्वकाही मिळाले त्याच्यासोबत मात्र कधीच धोकेबाजी करु नये. नाहीतर इतिहासात त्यांची गद्दार म्हणून नोंद होते.आंबेडकरी विचारधारा आणि १३३ वी भिम जयंती चे एडीट करतांना मला हे जाणवते म्हणूनच हे लिहतो. लोकसभा निवडणुकीत आम्ही कोणाला मतदान केले होते. यांची नोंद झाल्या शिवाय राहणार नाही. त्याचा विचार आजच करा. म्हणून कोणत्याही संघटनेत काम करणा-या कार्यकर्त्यांनी आपल्या संघटनेसोबत एकनिष्ठ राहावे. संघटनेत रुसवे, फुगवे, नाराजी, वादविवाद चालतच असतात.पण ज्या संघटनेमुळे आपल्याला सर्वकाही मिळाले त्याच्यासोबत मात्र कधीच धोकेबाजी करु नये.नाहीतर इतिहासात त्यांची गद्दार म्हणून नोंद होते.आंबेडकरी विचारधारा आणि १३३ वी भिम जयंती चे एडीट करतांना मला हे जाणवते म्हणूनच हे लिहतो.लोकसभा निवडणुकीत आम्ही कोणाला मतदान केले होते. यांची नोंद झाल्या शिवाय राहणार नाही. त्याचा विचार आजच करा.

आंबेडकरी क्रांतिकारी विचारधारा असणाऱ्या सर्व संस्था,संघटना आणि पक्ष आज कोणत्या मार्गाने जात आहेत.या कोणत्या प्रश्नावर एकत्र येऊ शकतात?.या सर्वांना एकाच ठिकाणी आणण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांची कामगार चळवळ स्वतंत्र मजदूर युनियन (आय एल यु ) ही राष्ट्रीय ट्रेंड युनियन आदरणीय जे एस पाटील राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या कुशल,त्यागी निस्वार्थी नेतृत्वाखाली करू शकते. जगातील कामगारांनो एक व्हा सांगणारे जाती धर्माच्या शोषणाच्या विरोधात बोलत नव्हते म्हणून मनुवादी,हिंदुत्ववादी संघटना पक्ष आज डोके वर काढत आहेत त्यांना मोठ्या संख्येने आर्थिक पाठबळ आणि मतदान याचं कामगार कर्मचारी अधिकारी वर्गाने केले.त्यांच्या मुळेच सर्व सरकारी उद्योग धंद्याचे खाजगीकारण कंत्राटीकारण होत आहे त्याला बारा राष्ट्रीय ट्रेंड युनियनने व त्यांच्या राजकीय पक्षांनी ठोस भूमिका घेऊन जबाबदारी पार पाडली नाही.त्यांचा सर्वात मोठा बळी मागासवर्गीय समाजातील कामगार कर्मचारी अधिकारी आणि विद्यार्थी ठरत आहे. म्हणूनच आंबेडकरी विचारधारेच्या संस्था, संघटना युनियन,राजकीय पक्ष यांची बांधणी होणे आवश्यक आहे.सामाजिक संघटना,धार्मिक संस्था संघटना,राजकीय पक्ष खूप आहेत.पण त्य कोणत्याही समस्यावर एकत्र येऊ शकत नाहीत.पण एक कामगार,मजूर शेतमजूर,कर्मचारी अधिकारी म्हणूनच एका बाबासाहेबांनी दिलेल्या नावावर स्वतंत्र मजूर पक्षा नंतर स्वतंत्र मजदूर युनियन च्या नावाखाली संघटीत होऊन जागतिक पातळीवर अनेक समस्या सोडू शकते.हेच डॉ.बाबासाहेबांनी लिहून ठेवले आहे. तरच संविधानाच्या चौकटीत देशात बहुजन हिताय बहुजन सुखाय होऊ शकते. करिता आंबेडकरी विचारधारा आणि १३३ वी भिम जयंती साजरी करतांना त्यांचे परीक्षण झाले पाहिजे.अभ्यास करून मुले दरवर्षी नापास का होतात. त्यांना शिकवणारे एकूण घटक शिक्षक,संस्था कर्मचारी,सरकारी शिक्षण अधिकारी सर्वच व्यवस्था जबाबदर असायला पाहिजे.म्हणूनच आंबेडकरी विचारधारा आणि १३३ वी भिम जयंती याची सकारत्मक विचार करून समीक्षा झाली पाहिजे.प्रत्येकांनी ती व्यक्तिगत पातळीवर करून घेऊन नगरात एकत्र आले पाहिजे.नंतर वार्ड,विभाग तरच पुढे काय यांचे उत्तर शोधता येईल.भिम जयंती साजरी करण्यासाठी सर्वच तन,मन,धनाने एकत्र येऊन उत्स्पुर्तपणे जोश मध्ये जयंती साजरी करतो.ती लक्षवेधी असते.विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांना त्रिवार वंदन आणि तमाम भारतीयांना १३३ व्या भिम जयंती निमित्य हार्दिक शुभेच्छा.


– सागर रामभाऊ तायडे,

भांडुप, मुंबई

मो. ९९२०४०३८५९,

अध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !



## श्री धनराज साठे

भक्ती शक्ती मंगल कार्यालय,
लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !



## श्री एस.के.बनसोडे

नायब तहसिलदार,
महसुल विभाग, जिल्हाधिकारी
कार्यालय, लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !



## श्री रमाकांत पिडगे

प्रमुख स्वच्छता निरीक्षक,
मनपा, लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !



## श्री ए.टी. सोनवणे

मुख्याध्यापक, सिद्धेश्वर प्राथमिक शाळा
खडक हनुमान लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !



## श्री व्यंकट वाघमारे

माजी नगरसेवक,
महानगरपालिका, लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !



## श्री विशाल जगदाळे

दुय्यम निबंधक
कार्यालय, लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री किशोर गायकवाड

जिल्हाध्यक्ष, स्वस्त धान्य
दुकानदार संघटना, लातूर

## श्री बी.आर.कांबळे

गोडाऊन
व्यवस्थापक, लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !



## श्री त्र्यंबक चव्हाण

मंडळ अधिकारी, औसा
तहसिल, औसा

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !



## एस. व्ही. कराड

मुख्याध्यापक, येणेगुरे हायस्कुल
खडक हनुमान, लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !



## श्री गिरीष डोईजोडे

अध्यक्ष, लातूर
तालुका तलाठी संघटना

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री बंटी राजुरे

क्षेत्रीय अधिकारी
क्षेत्र क्र. बी, मनपा, लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## राफतअली कोतवाल

राज्य उत्पादन शुल्क
निरीक्षक, लातूर

# निवडणूक खर्च निरीक्षक संजीब बॅनर्जी यांनी घेतला विविध समिती, पथकांचा आढावा



लातूर (प्रतिनिधी) : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर लोकसभा मतदारसंघासाठी नियुक्त निवडणूक खर्च निरीक्षक संजीब बॅनर्जी यांनी शासकीय विश्रामगृह येथील कार्यालयात निवडणूक खर्च विषयक विविध समिती, पथकांचा आढावा घेतला. अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, अतिरिक्त जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवडणूक खर्च संनियंत्रण समितीचे प्रमुख अप्पासाहेब चाटे, आयकर विभागाचे संजय पानसरे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक केशव राऊत यांच्यासह विविध पथकातील अधिकारी यावेळी उपस्थित होते. लातूर लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाली असून निवडणुकीत उमेदवारांकडून होणाऱ्या प्रत्येक खर्चाची नोंद त्याच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात यावी. मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी उमेदवारांकडून होणार नाही, तसेच मतदारांना कोणतेही प्रलोभन दाखवून मतदानाचे आवाहन केले जाणार नाही, याबाबत सर्वांनी सतर्क राहावे. प्रचारासाठी वापरण्यात येणारी विविध माध्यमे, जाहिराती, सभा, मिरवणुका यामध्ये होणाऱ्या प्रत्येक खर्चावर लक्ष ठेवावे. मतदानासाठी पैसे, मद्य वाटपासारखे प्रकार घडणार नाहीत, याची संबंधित पथकांनी काळजी घेण्याच्या सूचना श्री. बॅनर्जी यांनी केल्या.

केंद्रीय वस्तू व सेवा कर विभाग, पोलीस विभाग, सी-व्हिजील, माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती, स्थिर निरीक्षण पथके, भरारी पथके, व्हिडीओ निरीक्षण पथके यांचाही निवडणूक खर्च निरीक्षक श्री. बॅनर्जी यांनी घेवून निवडणूक कामकाजाबाबत सूचना केल्या.

# आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वात रापका ग्राम पंचायत सदस्यांचा भाजपात प्रवेश



निलंगा (प्रतिनिधी) : निलंगा मतदारसंघातील रापका येथील ग्रामपंचायत सदस्य राहुल सूर्यवंशी आणि भरत ढगे यांनी माजी मंत्री लोकनेते आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या कार्यावर विश्वास ठेवत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारत घडविण्याचा संकल्प यावेळी त्यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, रापका गावातील बुथ प्रमुख सुभाष भडे यांच्यासह शेषराव ममाळे,दत्ता मोहळकर, तम्मा माडीबोने, सुमित इनानी यांच्यासह भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काळ्या दगडाच्या पिचिंगवर हिरवीगार झुडपे अबब! प्रकल्पाच्या पाळूवरच वाढली झुडपे



किनवट (शेख शौकत) : किनवट तालुक्यातील नागझरी या मध्यम प्रकल्पाच्या पाळूला असलेल्या पिचिंगवरच झाडेझुडपे वाढली आहेत. झुडपांची मुळे खोल गेलीतर या प्रकल्पाच्या भिंती (पाळू) ला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या झुडपांकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष का होत असावे? असे बोलले जात आहे. किनवटपासून पूर्वेला आठ ते दहा किलोमीटर अंतरावर पाटबंधारे विभागाचा नागझरी हा मध्यम प्रकल्प असून, याच प्रकल्पात किनवट शहरासाठी राखीव पाणीसाठा ठेवला जातो. चाळीस वर्षांपूर्वीच्या हा प्रकल्प असून, शेतकऱ्यांना सिंचनाची सोय व्हावी म्हणून या प्रकल्पाची निर्मिती किनवट नागद्वारी मध्यम प्रकल्पाच्या पाळू वर वाढलेली झाडे-झुडपे झुडपामुळे कोणताही धोका नाही. याबाबत पाटबंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता यश गायकवाड यांना विचारले असता ते रेग्युलर काम असून, दोन वर्षांपूर्वी झुडपे काढली होती.

आताही झुडपे काढण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. मंजुरी मिळाली नसल्याचे त्यांनी 'पत्रकारा'शी बोलताना सांगितले. झुडपामुळे तसा कोणताही धोका नसल्याचेही ते म्हणाले. केली आहे. या प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रापर्यंत पाणीच पोहोचत नाही. पोहोचले तरी काही शेतातील कॅनॉल गायब झाले आहेत. त्यामुळे प्रकल्पीय क्षेत्र सिंचनाखाली येत नसल्याचे दिसून येत आहे. भूखंडाचे श्रीखंड करण्यासाठी कॅनॉल चऱ्या भुसपाट करण्यात आल्याचे चित्र आहे.

नागझरी या मध्यम प्रकल्पाच्या पाळूला असलेल्या दगडाच्या पिचिंगवर झाडेझुडपे वाढल्याने भविष्यासाठी प्रकल्पाला धोका होण्याची भीती शेतकरी, जाणकार व्यक्त करत आहेत. प्रकल्पाच्या सर्व पाळूवर झुडपे वाढली असताना इकडे संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांचे का लक्ष नसावे? याबाबत उलटसुलट बोलले जात आहे. उल्लेखनीय म्हणजे किनवट तालुक्याचे भूमिपुत्र संतोष तिरमनवार हे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगरचे कार्यकारी संचालक आहेत. त्यांच्या कार्यकाळात तरी तालुक्यातील प्रकल्पावर चांगली निगराणी असायला हवी, असे आम जनतेत बोलले जात आहे.

# महात्मा बसवेश्वरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ ग्रंथाचे प्रदर्शन

## यवतमाळ येथील आंबेडकरी विचाराचे सामाजिक कार्यकर्ते दुर्वासराव गवई यांच्या हस्ते उद्घाटन

लातूर (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासन, मा. शिक्षण संचालक, पुणे व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील ग्रंथालय समितीच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयातील ग्रंथालय सभागृहात दुर्मिळ ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन यवतमाळ येथील आंबेडकरी विचाराचे सामाजिक कार्यकर्ते दुर्वासराव गवई यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारमंचावर निर्मला गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, ग्रंथालय समिती प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, रासेयो डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, रमेश राठोड आणि कीर्ती मिटकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून विनम्रपणे अभिवादन करण्यात आले. यानंतर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते दुर्वासराव गवई म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण भारतवासीयांसाठी अत्यंत मौलिक असे योगदान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ग्रंथावर अपार प्रेम करणारे अभ्यासक व विचारवंत होते. त्यांनी ग्रंथासाठी राजगृह बंगला बांधल्याचे आपणास ज्ञात आहे असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे मराठवाड्यातील सहा शाखांमध्ये ज्ञानदान देणारे एक महत्त्वाचे महाविद्यालय असून शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम महाविद्यालयातर्फे राबवले जातात. आज ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून सर्वांना वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ ग्रंथाचे प्रदर्शन ग्रंथालय सभागृहामध्ये ठेवण्यात आले आहे याचा आपण सर्वांनी लाभ घ्यावा असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील ग्रंथालय हे मराठवाड्यातील पहिल्या क्रमांकाचे ग्रंथालय असून येथे दोन लाखाच्यावर ग्रंथ संपदा आहे. यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दुर्मिळ ग्रंथाचे प्रदर्शन आज महाविद्यालयातील ग्रंथालयात संपन्न होत आहे याचा मला मनस्वी आनंद आला आहे. या ग्रंथोत्सवाचा महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि लातूर शहरातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले तर आभार डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय गिरी, केदार इटगे, गोरख पाखरे, रंगनाथ लांडगे, शुभम बिराजदार आणि संयम गवई यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.बाबासाहेब-प्रेरक उद्धारक आणि तारक शक्ती!



**भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेतला. ते देशासाठी व समाजासाठी अहोरात्र झटले. त्यांनी सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरत आहे. अशा या थोर महापुरुषात विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात प्रथम उच्चारावे लागेल. त्यांच्या जयंतीनिमित्त श्री. एन. के. कुमार गुरूजींचा हा लेख प्रपंच.**

डॉ.बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने त्यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतून बहुजन समाजक्रांतीचे स्फुलींग चेतविले. त्यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले. बाबासाहेब म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय. ते नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मानव मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले. रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्रीवर्गाच्या, शेतकरी-मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखवली. मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीयच नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तथा भारताच्या राष्ट्रीय ग्रंथ- संविधानाचे ग्रंथकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी दि.१४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दांपत्य दक्ष असत. स्वतःसह भीमरावांना वाचनाची खुप आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. वडील रामजी हे मुलांनाही चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते. जगद्गुरू संत तुकारामजी व संतशिरोमणी कबीर हे बाबासाहेबांच्या भावी आयुष्यात अभ्यासाचे विषय झालेले दिसतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीती, अत्याचार, अन्याय यांना त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय बहुजन समाज एकसंघ होणार नाही, असे ते समजत.

डॉ.बाबासाहेब म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व समाजिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क हे आपल्याला कळत नाही, अशा प्रकारे त्यांनी समाजात सामाजिक क्रांतीचे रणशिंगच फुंकले. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरीही त्यांनी दूर केली. इ.स.१९२७ ते १९५६पर्यंतच्या काळात त्यांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा वाढावा म्हणून सतत प्रयत्न केले. सन १९४२ साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, स्वच्छता पाळा. सर्व दुर्गुणांपासून दूर रहा. मुलामुलींना शिक्षण अवश्यच द्या. त्यांना महत्वाकांक्षी बनवा. त्यांचा न्यूनगंड दूर करा, अशा महत्वपूर्ण उपदेशांचे डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजीवींसाठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे, म्हणून ते आजीवन सातत्याने संघर्ष करीत राहीले. केवळ दलितासाठीच नव्हे, तर शेतकरी, शेतमजूर, मजूर आणि कामगार आदींच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी, यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो माणूस प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही,'' असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. ''प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे. त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी.

समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन इ.स.१९४६ साली करून त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय, असे ते मानत. डॉ.बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ.आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तत्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली. त्यांना वाटले, डॉ.आंबेडकर आता देश सोडून जाणार की काय? परंतु या महामानवांनी निक्षून सांगितले, ''आम्ही या भारत देशाची संतान आहोत. आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच. राष्ट्रावर संकट आल्यास प्राण पणाला लावून देशाचे रक्षण केले व पुढेही करूच!'' यात डॉ.आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा सामावलेली दिसून येते. अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व बहुजनवर्गाच्या समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महानतम सर्वोत्तम देणगी होय. अशा या महामानवाचे दि.६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. त्यांनी आपल्या कार्याचा ठसा आमच्यासाठी मागे उमटवून ठेवला. नमो बुद्धाय, जय भीम!

!! जयंतीनिमित्त विश्ववंद्य महामानवास विनम्र अभिवादन !!


- श्री. एन. के. कुमार गुरूजी.

मु.पो. ता.जि. गडचिरोली.

मोबा.नं. ७७५०४१०८६.


***





# महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एक मनाने, एक दिलाने प्रचार कार्यात सहभागी व्हावे

## लातूर ग्रामीण महायुती पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत आ. रमेशअप्पा कराड यांचे आवाहन

लातूर (प्रतिनिधी) - जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात देशाने सर्वांगीण विकासात मोठी उंची गाठली असून देशाच्या प्रगतीसाठी मतदार संघाच्या विकासासाठी पुन्हा पंतप्रधान होणे काळाची गरज आहे तेव्हा लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि मित्र पक्षातील सर्व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एक मनाने एक दिलाने आणि एक विचाराने प्रचार कार्यात सहभागी होऊन उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना अधिकाधिक मताधिक्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचार नियोजन निमित्ताने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा व मित्र पक्षातील महायुतीच्या प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधीची बैठक भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी दुपारी झाली. या बैठकीस भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, भाजपा पंचायत राज व ग्रामविकास सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, शिवसेनेचे युवा जिल्हाप्रमुख कुलदीप सूर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे लातूर तालुकाध्यक्ष अजित शिंदे, रेणापूर तालुकाध्यक्ष विनोद आंबेकर, शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार सुरवसे, सदाशिव गव्हाणे रिपाईचे रेणापूर तालुकाध्यक्ष धम्मानंद घोडके, लातूर तालुकाध्यक्ष विजयकुमार गायकवाड भाजपाचे रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भाऊ भिसे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.



यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी येत्या १६ एप्रिल रोजी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील महायुतीचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आलेला असल्याची माहिती दिली. नरेंद्रजी मोदी तिसऱ्यांदा शंभर टक्के पंतप्रधान होणार आहेत. तेव्हा आपल्या घरात लग्न असल्याने भाजपा कार्यकर्त्यांनी महायुतीतील मित्र पक्षाशी समन्वय साधून एक दिलाने एक विचाराने काम करावे असे बोलून दाखवले.

केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून प्रत्येक गावात वाडी वस्तीत प्रत्येक समाजासाठी कोट्यावधीचा निधी विकास कामांना मिळून दिला, त्याचबरोबर वैयक्तिक लाभाच्या योजनांचा मोठ्या प्रमाणात अनेकांना लाभ दिला असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आल्यापासून काँग्रेसच्या ताब्यात आहे गेल्या पंधरा वर्षात काय विकास केला. कोणती सामाजिक आणि विकासाची कामे झाली आणि गेल्या तीन वर्षात आपण गावा गावात किती लाखाचा निधी दिला, कोणती कामे आपल्यामुळे झाली आणि होत आहेत याची मतदारात चर्चा कार्यकर्त्यांनी घडवून आणावी आणि भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना लातूर ग्रामीण मतदार संघातून जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देण्यासाठी प्रत्येकाने मेहनत घ्यावी असे आवाहन केले.

या बैठकीत बोलताना नवनाथ भोसले यांनी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबानंतर मतदार संघात आ. रमेशआप्पा कराड यांच्याच माध्यमातून विकास कामासाठी निधी मिळाला असल्याचे सांगून जात, धर्म, आपला, जवळचा, दूरचा असा भेदभाव केला नसल्याचे बोलून दाखविले तर राष्ट्रवादीचे अजित शिंदे यांनी देश हितासाठी नरेंद्रजी मोदी साहेबांसोबत जाण्याचा निर्णय अजित दादा पवार साहेबांनी घेतला. दादाच्या सूचनेनुसार राष्ट्रवादीचे सर्व कार्यकर्ते जिद्दीने काम करून सुधाकर शृंगारे यांच्या विजयात खारीचा वाटा उचलतील यात शंका नाही असे बोलून दाखवले. शिवसेनेचे कुलदीप सूर्यवंशी यांनी विकास कशाला म्हणतात हे आ. रमेशआप्पा कराड साहेबांनी कृतीतून दाखवून दिले आहे. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार खांद्याला खांदा लावून आणि जी जबाबदारी द्याल ती शिवसेना पार पडेल असे बोलून दाखवले. जिकडे आठवले तिकडे सत्ता हे समीकरण सिद्ध झाले असून महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना मताधिक्य वाढविण्यासाठी रिपाईचे कार्यकर्ते मोठ्या जिद्दीने काम करतील असा विश्वास विजयकुमार गायकवाड यांनी व्यक्त केला. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे विनोद आंबेकर, रिपाईचे धम्मानंद घोडके, अल्पसंख्याक आघाडीचे रशीद पठाण, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले तर शेवटी सतीश आंबेकर यांनी आभार व्यक्त केले. या बैठकीस लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, रिपाई यासह मित्र पक्षातील महायुतीचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विकासाकडे घेवून जाणारा काँग्रेसचा जाहीरनामा घरोघरी पोहचवा

## आ. धिरज देशमुख यांचे कार्यकर्त्यांना आवाहन; 'लातूर ग्रामीण'मध्ये आता स्नेहभेटींना सुरवात;

लातूर (प्रतिनिधी) : काँग्रेस व इंडिया आघाडीच्या नेत्यांनी लोकांमध्ये जावून, लोकांना काय हवे आहे, हे जाणून घेवून लोकांच्या मनातला जाहीरनामा तयार केला आहे. देशाचा, देशातील सर्वसामान्य माणसाचा विकास साधणारा हा जाहीरनामा आहे. तो आपल्या सर्वांच्या हिताचा आहे. या जाहीरनाम्याचे घरोघरी वाचन झाले पाहिजे. यासाठी प्रत्येकाच्या घरापर्यंत काँग्रेसचा जाहीरनामा पोहचवा, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी शनिवारी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघांमध्ये आमदार धिरज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लोकसभा निवडणुकीचा प्रचार जोमाने सुरू आहे. संवाद बैठकांबरोबरच आता घरोघरी स्नेहभेटी घेवून काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा प्रचार केला जात आहे. लातूर तालुक्यातील सोनवती, सारोळा येथे जावून आमदार धिरज देशमुख यांनी ग्रामस्थ, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला. तत्पूर्वी, भातखेडा, चिकलठाणा, कासारखेडा, खुलगापूर, मळवटी, धनेगाव येथे जावून ग्रामस्थ, पदाधिकारी, कार्यकर्ते यांची स्नेहभेट घेत त्यांच्याशी संवाद साधला.


आमदार धिरज देशमुख म्हणाले, भाजप सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅसचे भाव कमी करण्याऐवजी दुप्पट, तिप्पट केले. सोयाबीनचे भाव वाढविण्याऐवजी कमी केले. उच्चशिक्षितांना रोजगार दिला नाही. व्यापाऱ्यांना जाचक अटी घालून अडचणीत आणले. भाजपने गेल्या दहा वर्षात लोकांना आश्वासनांची खोटी भूरळ घालून फसवले. पण, काँग्रेसला खोटी आश्वासने देणे जमत नाही. त्यामुळेच काँग्रेसने आपल्या कार्यकाळात देशाचा कृषी, औद्योगिक, विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रासह सर्वांगीण विकास केला. पायाभूत सुविधा मजबूत केल्या. आपत्तीत शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. सर्वसामान्य, गोरगरीब, बहुजनांचा हात कधीच सोडला नाही. यापुढेही सोडणार नाही.

**देशाचा विकास हीच काँग्रेसची गॅरंटी**

देशाचा, सर्वसामान्य जनतेचा विकास साधण्याची गॅरंटी काँग्रेस पक्षाने आपल्या जाहीरनाम्यातून दिली आहे. काँग्रेसने आजवर जी आश्वासने दिली आहेत, जी गॅरंटी दिली आहे ती लगेच काँग्रेस पूर्ण करते. लोकांना फसवत नाही. त्यामुळे जनतेने काँग्रेसला आशीर्वाद देवून अधिक बळ द्यावे. आपले लातूरचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना बहुमताने विजयी होण्यासाठी कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी मेहनत घ्यावी, सूक्ष्म नियोजन करून त्यांचा प्रचार करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

याप्रसंगी शिवसेनेचे नेते पप्पूभाई कुलकर्णी, अनुप शेळके, सुभाष घोडके, राजकुमार पाटील, सुनिल पडिले, प्रताप पाटील, प्रवीण पाटील, धनराज दाताळ, शंकर बोळंगे, मनोज पाटील, युवराज जाधव, पंडित ढमाले, संभाजी रेड्डी, ज्ञानोबा गवळे, बादल शेख, रघुनाथ शिंदे, शिवाजी देशमुख, आविष्कार गोजमगुंडे, अंगदराव पाटील, शिवाजी जाधव, श्रद्धा जवळगेकर, रामेश्वर हालके, राहूल मातोळकर, संजय रणखांब, कमलाकर शिंदे, अंगद वाघमारे, भालचंद्र पाटील, विनोद बडगीरे, हरिप्रसाद निटुरे, संतोष कुटवाडे, नामदेव पाटील भास्कर पाटील, मधुकर शिंदे, बालाजी सुरवसे, तानाजी मस्के, किशोर सूर्यवंशी, तुकाराम जाधव, सुभाष माने, पी. के. जाधव-देशमुख, विश्वांभर मुळे, महादेव इंगळे, त्र्यंबक रणखांब, विश्वासराव कुलकर्णी, सिद्धार्थ सोनवणे, श्रीकांत बैले यांच्यासह महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# भिमाचं नाव गाजतेय गावगाव



भिमजंयती अर्थात चौदा एप्रिल म्हणलं की सर्वोत्तम आनंदाचा दिवस. हजारो वर्षापासून अंधविश्वास, विषमता, अस्पृश्यता, अज्ञान या मध्ये गुरफटून हक्क अधिकार व मानसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्कच नाकारून माणवाला पशुतुल्य वागणूक देणारी विकृती देशात जोपासली जात होती. प्रगतीची व जागृती ची दारे पुर्णपणे बंद करून वैचारिक मागासलेपणा वाढलेला होता. देशातील सामाजिक परिस्थिती एवढी भयावह होती की माणसाला माणसाच्या सावलीचा ही विटाळ व्हायचा. कामाचे वर्गीकरण करून विशिष्ट कामे विशिष्ट समुहाकडूनच करून घेतले जायचे. विशिष्ट लोकांचे वर्तन जरी निच असले तरीही त्यांना श्रेष्ठ समजण्याचा आग्रह होता. नैसर्गिक साधन संपती चा वापरही सर्वजण सारख्या प्रमाणात करू शकत नव्हते. एवढे वैचारिक व सामाजिक मागासलेल्या देशाला प्रगती, जागृती व देशातील लोकांना समता, बंधुता, न्याय, समान संधी, समान सन्मान, समान अधिकार देऊन माणसाला माणूस म्हणून जगण्याचा व नैसर्गिक आणि सार्वजनिक संपतीचा सारखाच उपभोग घेण्याचा अधिकार बहाल करून खऱ्या अर्थाने देशात संस्कृती पेरण्याचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. याचाच फायदा देशातील करोडो लोकांना होऊन करोडो लोकांचा उद्धार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे झाला. देश एकसंघ बनुन सर्व लोक आनंदाने राहतील अशी व्यवस्था डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण करून दिली. विशिष्ट लोकांनी पेरलेली विकृतीमुळे देश व देशातील जनता कायम कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या गुलामगिरी मध्ये अडकून होती. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी पेरलेल्या संस्कृती मुळे माणूस हा शारीरिक व वैचारिक स्वातंत्र्य झाला. माणवाला स्वातंत्र्य मिळवून देणारे एकमेव महामानव म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर होत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची विद्वत्ता, कार्य याची दखल जगातील जवळपास सर्वच देशांनी घेतल्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक पातळीवरचे विद्वान, सामाजिक क्रांतिकारक व करोडो लोकांचे उद्धारक म्हणून त्यांची ओळख कायम आहे. ज्ञानाचे प्रतिक म्हणून जगातील एकमेव महामानवाला गौरविण्यात आले ते म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षाची, त्यागाची व कार्याची जाणीव ठेवून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना माणणारा मोठा वर्ग येथे आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची एकमेव जयंती अशी आहे की जी प्रत्येक गावात तर साजरी होतेच पण जगाच्या काना कोपऱ्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या किर्तीचा व कार्यांचा सुगंध दरवळतो ही अभिमानाची बाब आहे. आणि अशा जागतिक पातळीवरील महामानवाचे आपण अनुयायी आहोत असा विचार केला तर अजुनच स्वतः स्वत:चा गर्व वाटायला लागतो. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिन हा जगातील सर्वोच्च महोत्सव म्हणून साजरा केला जातो.

जनमानसात स्वंयस्फुर्तीने, स्वंय निधीतून हा महोत्सव साजरा करून आनंद व्यक्त केला जातो. भिज जयंती अर्थात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती महोत्सव ज्या उत्साहाने, ज्या आपुलकी साजरा होतो तसा दुसरा दिवस जागतिक पातळीवर शोधुनही सापडणार नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार यांची जाणीव असलेले लोक आता प्रत्येक जातीधर्मात कमी अधिक प्रमाणात, प्रत्येक गावात आहेत. मुळात विकृती ची पेरणी करून मानसाचे मान सन्मान व अस्तित्व नाकारणाऱ्या विकृत लोकांनी व जातीची घाण डोक्यात असलेल्या आणि मेंदुचा वापर न करणाऱ्या लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार जातीत बंध करून धर्मविरोधी दाखवण्याचा बदमाश पणा केला. विकृत लोक स्वतः स्वत:ला श्रेष्ठ समजून काही जातींच्या माध्यमातून विकृती चा अजेंडा राबण्याचे काम सतत करत आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार हे मानवाच्या उद्धाराचे आहेत हेच लोकांना कळू नये यासाठी आजही विकृत लोक त्यांच्या परिने काम करत आहेत. परंतु जे लोक जागृत आहेत, जे लोक मेंदुचा वापर करून सत्य शोधण्याचा प्रयत्न करतात आणि जे लोक माणसिक गुलामी झुगारून वैचारिक परिवर्तन करण्याची तयारी दाखवतात अशा प्रत्येक व्यक्तीसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर हे प्राथमिक आदर्श व मार्गदाते आहेत. भारतीय लोकांची एक मोठी अडचण म्हणजे माणसिक गुलामीची व जातीव्यवस्थेच्या माध्यमातून वैचारिक मागास राहण्याची सवय झाल्याने यांना जातीचे व अज्ञान आणि अंधविश्वास पसरवणारे लोक पाहिजे. जागृत करून शिक्षण आरोग्य समता, बंधुता व राष्ट्रहीत जोपासणारे महामानव यांना नको वाटतात. कारण वर्षानुवर्षे विकृत लोकांच्या विकृत विचाराला संस्कृती म्हणून जोपासले गेले. आणि विकृत विचार लोकांनी सोडू नये म्हणून डोक्यामध्ये भिती निर्माण करून कर्मकांड व अंधविश्वास निर्माण केला. अंधविश्वास आणि कर्मकांड बाजूला सारला तर आज देश महासत्ता होऊन करोडो लोक बंधुभावाने नांदतात. परंतू विकृत लोकांचे पोट व व्यवस्था अंधविश्वास आणि कर्मकांडावर असल्याने ते सतत त्याची पेरणी करून लोकांना तत्रज्ञानाच्या युगातही अज्ञानातच ठेवत आहेत. संत बसवेश्वर, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, संत रविदास महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर हे वेगवेगळ्या जातीचे परंतु मानव समाजाला जागृत करणारे महामानव व संत होऊन गेले. यांचे विचार व कार्य प्रत्येक मानवासाठी कल्याणाचे आहेत. परंतु यांना जातीत बंद करून धर्मविरोधी दाखवण्याचा प्रयत्न हीन लोकांनी केला. आणि पाखंडी, भोंदु लोकांना धर्मगुरू म्हणून मान्यता दिली. जातीव्यवस्थेच्या चिखलात रुतलेल्या लोकांना जातीव्यवस्था ही हवीहवीशी वाटते म्हणून असे विकृत लोक आजही समतावादी व विज्ञानवादी संत महापुरुष आपल्या घरी आनत नाहीत किंवा त्यांचे विचार स्विकारत नाहीत. अशी परिस्थिती असताना ही जेथे जेथे समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय याचा उल्लेख होतो तेथे तेथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घ्यावेच लागते. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रपुरुष जागतिक विद्वान होते. त्यांची बुद्धिमत्ता, कार्य व विचार स्विकारून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना एक महामानव म्हणून स्विकारले तर मानवाच्या सर्व समस्या नष्ट होऊन सर्वांना विकासाची दारे खुली होतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे वैचारिक दृष्टीने आणि सामाजिक व आर्थिक दृष्टीने आता बौद्ध चांगल्या प्रमाणावर सुधारलेले दिसतात.

काही मतीमंद लोकांच्या मते बौद्धांचा विकास आरक्षणामुळे झाला. परंतु अशा लोकांना बौद्धत्तेतर लोकांना ही आरक्षण आहे आणि ते वैचारिक दृष्टीने मागास आहेत याची जाणीव होत नसेल का? उलटपक्षी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा कोणत्याही जाती धर्मातील व्यक्ती स्वाभिमानाने जिवन जगून निरपेक्ष व निडर बनतो. हेच परिवर्तन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. महिलांचा पाठीराखा, महिलांना हक्क अधिकार आणि सन्मान मिळून देण्यासाठी राजीनामा देणारे एकमेव मंत्री म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर. महिलांचा जो आज साज आहे, जो स्वाभिमान व स्वातंत्र्य आहे हे केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. जेव्हा महिला हक्क अधिकार आणि समतेच्या व संधिच्या गोष्टी करते तेव्हा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा जय झालेला असतो. बहुतांश महिलांना याची जाणीव नाही तो भाग वेगळा. परंतु ज्यांना याची जाणीव आहे अशा महिला सुद्धां डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व विचाराचा प्रचार आणि प्रसार सतत करत असतात. विषमतावादी लोक सोडले तर समतावादी आणि विज्ञानवादी लोक दररोज प्रत्यक्ष अप्रत्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर प्रबोधन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा नावाचा गवगवा केला जातो. मानवी विकासाला अडसर ठरणारी विकृती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मातीत गाडून माणासाला माणूस म्हणून वागवणारी, सन्मान व संधी निर्माण करून देणारी आणि सामाजिक संस्कार घालणारी व्यवस्था निर्माण करून करोडो कुळांचा उद्धार केला. अशा या महामानवाचे नाव जगभरात गाजने साहजिकच आहे. स्त्रियांचे मुक्तीदाते, प्रत्येक मानवाचे उद्धारक, देशाचे शिल्पकार, भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला व विचारांना अभिवादन आणि जयंती च्या मंगलमय सदिच्छा..

- विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

***

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

**श्री सौदागर तांदळे**
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

**श्री सुधीर दादा देशमुख**
नायब तहसिलदार
उपविभागीय कार्यालय,
लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

**शेख खदीर**
लेखा अधिकारी
लातूर शहर महानगरपालिका लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

**श्री संजय घाडगे**
मंडळ अधिकारी पळशी
तहसिल कार्यालय, रेणापूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

**श्री अनिल कांबळे**
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
प्रशासकीय इमारत
कार्यालय, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

**श्री राहुल बानाटे**
गोडाऊन व्यवस्थापक,
औसा



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

**श्री राहुल जाधव**
लातूर




विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

स्थापना १९९८ र.रं. महा.८२८६/एफ ५७७२
आर्य वैश्य प्रतिष्ठान, लातूर द्वारा संचलित...

**कमला मुलींचे वसतीगृह**

* अद्यावत सुसज्ज इमारत, * सर्व कॉलेज, ट्युशन्स अगदी जवळ * इन्व्हर्टर सुविधा,
* अभ्यासासाठी शांत व प्रसन्न वातावरण, * शुद्ध शाकाहारी सात्विक भोजनाची सुविधा

प्रोप्रा. सौ. मिरा कुंचमवार
मो. ९४२२०७१२३२, ९४०३९३४३००
सर्व सोयीनियुक्त असे एकमेव ठिकाण...

आर्य समाज मंदिराजवळ, गांधी चौक, लातूर


विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

**श्री आर.सी. स्वामी**
उपअभियंता,
महाडा मुंबई



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

**श्री गणेश सरोदे**
निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, लातूर





# पिकांसह फळबागांचे नुकसान, वीज पडून बैल ठार



शि.अनंतपाळ (प्रतिनिधी) – शहरासह तालुक्यात गुरूवारी दुपारी विजेच्या कडकडाटासह झालेल्या वादळी वा–यासह जोरदार पाऊस झाला. यात फळबागांचे मोठे नुकसान झाले. तर उन्हाळी पिकांसह भाजीपाला वर्गीय पिकांना मोठा फटका बसला असून आनंदवाडी येथील रामा परले यांच्या बैलावर विज पडल्याने बैल जागीच ठार असून ऐन पेरणीपूर्व मशागतीत ही दुर्घटना घडल्याने शेतक–यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

या पावसाने कडक उन्हात थोडासा दिलासा मिळाला असला तरी या वादळी पावसाने आंबा,भाजीपाला व उन्हाळी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पावसाचा भाजीपाल्या ला फटका बसल्याने भाजीपाल्याचे भाव आता गगनाला भिडणार आहेत. तर आंबा पिकाला पावसाचा मार लागल्याने आंबा पिकाची प्रतवारी खराब होऊन बागायतदार शेतक–यांना आर्थिक फटका बसणार आहे. बुधवारी सायंकाळी वादळी वा–यासह झालेल्या पावसात विज गायब झाली होती.गुरूवारी दुपारी अचानक आकाशात काळे ढग जमले व विजेचा कडकडाटसह जोरदार पाऊस सुरु झाला. या वादळी वा–यामुळे काही ठिकाणी झाडे उन्मळून पडली. तर काही ठिकाणी घरावरील पत्रे उडाल्याने नागरिकांना या वादळी वा–याचा फटका बसला. दरम्यान तालुक्यातील आनंदवाडी येथील अल्पभूधारक शेतकरी प्रभु रामा परले यांनी आपली बैलजोडी शेतात बांधली होती. अचानक विजेच्या कडाकडाटासह आलेल्या वादळी पावसात विज पडल्याने त्यांच्या बैलजोडीतील एक बैल जाग्यावर ठार झाला आहे.मोठ्या कष्टाने बैल बारदाना उभा केला व पेरणीपूर्व मशागत सुरू असताना विज पडून सुमारे ६० हजारांचा बैल दगावल्याने शेतकरी उघड्यावर आला असून प्रशानाने तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी आपदग्रस्त शेतकरी प्रभु रामा परले यांनी केली आहे.

# जळकोट येथे झाडावर पडली वीज, कडबा जळून खाक



जळकोट (प्रतिनिधी) –

जळकोट शहर तसेच परिसरामध्ये सलग तिस–या दिवशी विजेच्या कडकडाळासह हलक्या पावसाच्या सरी बरसल्या, जळकोट शहरातील माजी सैनिक वीरभद्र विश्वनाथ कमलापुरे यांच्या शेतामधील कडुंलिबाच्या झाडावर वीज पडली. यामध्ये झाडाखाली ठेवलेला एक हजार कडबा जळून खाक झाला तर हिरवेगार असणा–या कडुंलिबाच्या झाडालाही पेट घेतला.

जळकोट शहरांमध्ये दि ११ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच ते सहाच्या दरम्यान विजेच्या प्रचंड अशा कडकडाटासह हलक्या पावसाला सुरुवात झाली. जळकोट शहराजवळ वीज पडल्याचा मोठा आवाज आला परंतु ही वीज शेतकरी विरभद्र विश्वनाथ कमलापुरे यांच्या शेतामध्ये असलेल्या कडुंलिबाच्या झाडावर पडली. यामध्ये सदरील शेतक–याचा १००० कडबा जाग्यावर जळून गेल्यामुळे सदरील शेतक–याचे मोठे नुकसान झाले. याच झाडाखाली पंधरा मिनिटांपूर्वी दोन बैल तसेच शेतकरी थांबले होते परंतु पाऊस सुरू झाल्यानंतर बैलाला पक्क्या शेडमध्ये बांधण्यात आले यामुळे जीवित हानी झाली नाही. विज पडल्याची माहिती सदरील शेतक–याने जळकोट सज्जाचे तलाठी धुपे यांना दिली. जळकोट शहरातील अशोक कारभारी यांच्या वाळलेल्या आंब्यावर दि ९ एप्रिल रोजी वीज पडली होती यामध्ये आंबा जळून खाक झाला. या दिवशीही कुठलीही जीवित हानी झाली नाही.

सध्या अवकाळी पाऊस तसेच वीज पडण्याचे प्रमाण वाढले असून , हवामान विभागाने दोन–तीन दिवस विजेच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा इशारा दिला असून पाऊस व विजेचा कडकडाट होत असताना झाडाखाली अथवा उघड्या जागेवर कोणीही थांबू नये , पक्या निवा–यामध्ये थांबावे, आपली जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत, असे आवाहन तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी केले आहे.




# दि अमाल रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्सचा शुभारंभ

लातूर (प्रतिनिधी) –

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते विधिवत पूजन व दीप प्रज्वलन करून शुक्रवार दि. १२ एप्रिल रोजी सायंकाळी लातुर शहरातील औसा रिंग रोड वरील सोना नगर या ठिकाणी दि अमाला रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्सचा शुभारंभ करण्यात आला. प्रो .प्रा. धनंजय कोंबडे आणि किरण उटगे यांनी सुरु केलेल्या या दि अमाला रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्सच्या माध्यमातून लातूरच्या खवय्यांना स्वादिष्ट व रुचकर, शुद्ध शाकाहारी पदार्थ ते सुध्दा माफक दरात उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. यावेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी रेस्टॉरंट डायनिंग हॉल,फंक्शन हॉल,कॉन्फरन्स पाहणी करून आसन व्यवस्था, ईटेरियरचे कौतुक केले. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातुरच्या होतकरु आणि तरुण सहकाऱ्यांनी नाविन्यपूर्ण कल्पना लातूरमध्ये साकारत या रेस्टॉरंटची उभारणी केली आहे हे कौतुकास्पद आहे.

लातूरच्या आजच्या या पिढीतील युवकांनी एकत्रित येऊन रेस्टॉरंट व्यवसायातील आंतरराष्ट्रीय दर्जाची बोहोमियन, फ्रेंच थीम या ठिकाणी साकारली असून यामुळे एक वेगळेपणा यात जाणवतो आहे. जे जे नवं ते ते लातूरला हवं हे आपण आदरणीय लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पासून ऐकत मार्गक्रमण करत आलेले आहोत आणि यासाठी आपल्या प्रत्येकाचा हातभार आजवर मिळत आला आहे . यापुढे देखील मिळत राहील यात शंका नाही असे सांगीतले. यावेळी पूढे बोलतांना ते म्हणाले, आपला लोकप्रतिनिधी म्हणून उत्तम वातावरण आपणास मिळणे ही आमची जबाबदारी असून आपल्याला आपला व्यवसाय करताना पोषक वातावरण कसे मिळेल, याकडे निश्चित लक्ष दिले जाईल. आपण ग्राहकांना माफ़क दरात उत्तम ग्राहक सेवा पुरवावी, अशी अपेक्षा व्यक्त करीत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दि अमाला रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्स चे प्रो.प्रा.धनंजय कोंबडे व किरण उटगे आणि त्यांच्या सर्व टीमला रेस्टॉरंट व्यवसाय वृद्धी साठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रस्ताविक करताना वैभव उटगे यांनी दि अमाला रेस्टॉरंट अँड ब्याकवेट्स संदर्भात उपस्थिताना माहिती देत आलेले अनुभव कथन केले आणि उपस्थित सर्वांचे आभार मानले.

यावेळी लातुर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष किरण जाधव, गणेश एस.आर.देशमुख, डॉ.प्रशांत उटगे, ड. दीपक सुळ, राम कोंबडे, समद पटेल, बालाजी कोंबडे, विजय देशमुख, श्रीनिवास येलगट्टे, सचिन दाताळ, डॉ विश्रांत भारती, डॉ. रमेश भराटे, वेदांत कोंबडे, वैभव उटगे, दत्तू कोंबडे यांच्यासह कोंबडे व उटगे मित्र परिवाराची उपस्थिती होती.

# मतदान जनजागृतीसाठी मराठवाडा व्यापारी महासंघाची उद्या बैठक

लातूर : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील मतदार नोंदणी वाढावी व मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी तसेच मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी एक सामाजिक उपक्रम म्हणून मराठवाडा व्यापारी महासंघाने विभागातील व्यापारी असोसिएशन, सराफ असोसिएशन, कापड असोसिएशन, दुकानदार भांडी असोसिएशन, फळ विक्रेता असोसिएशन आदी अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची बैठक जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर – घुगे यांच्या उपस्थितीत सोमवार, दि. १५ एप्रिल रोजी दुपारी ४.०० वाजता बार्शी रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालयातील डीपीडीसी हॉल येथे आयोजित केली आहे. या बैठकीस आपण स्वतः उपस्थित रहावे, असे आवाहन मराठवाडा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दिनेश गिल्डा यांनी केले आहे.व्यापारी महासंघ राज्य व जिल्हाभर विविध उपक्रम हाती घेते. राष्ट्रीय कर्तव्य म्हणून येणाऱ्या लोकसभा मतदारसंघात मतदार नोंदणी वाढावी व मतदानाची टक्केवारी वाढावी, जनजागृती करण्यासाठी व सदृढ लोकशाहीची परंपरा जोपासण्यासाठी आपण सर्व प्रयत्न करीत आहोत. या अनुषंगाने लातूर जिल्हा हा शैक्षणिकदृष्ट्या महाराष्ट्रात अग्रेसर असल्याने लातूर जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी इतर जिल्ह्याच्या पेक्षा अधिक व्हावी यासाठी वरील उपक्रम हाती घेतलेला आहे. तरी सर्व व्यापारी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी वेळेत उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात तक्रार निवारण व मतदार मदत कक्ष कार्यान्वित

लातूर (प्रतिनिधी) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ४१– लातूर (अ.जा.) लोकसभा मतदार संघात १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी सुरु झाली आहे. याअनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात तक्रार निवारण व मतदार मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यात तसेच लोकसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास नागरिकांनी या कक्षाच्या ०२३८२–२२४४७७ या दूरध्वनी क्रमांकावर आपली तक्रार नोंदवावी, असे आवाहन ४१– लातूर (अ.जा.) लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले आहे. हा नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित राहणार असून या कक्षात नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी दूरध्वनीद्वारे प्राप्त तक्रारींची दखल घेवून पुढील आवश्यक कार्यवाही करतील. तसेच निवडणुकीसंदर्भात मदत हवी असल्यास ०२३८२–२२४४७७ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा १९५० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

# शहराच्या पूर्व भागातील टवाळखोर गजाआड

लातूर (प्रतिनिधी) : अज्ञात व्यक्ती अंगाला खाद्य तेल लावून मध्यरात्री नागरिकांच्या घरात घुसतो. महिलांचे कपडे धारधार शस्त्राने कापून काढतो आणि निघुन जातो, अशी अफवा गेल्या आठ दिवसांपासून लातूर शहराच्या पुर्वभागात जोरदारपणे पसरली. या अफवेचे लोण हळूहळू व्यापक होत चालले होते. दरम्यान पोलिसांनी याबाबत सखोल तपास करून तीन टवाळखोरांना गजाआड केले आहे. शहरात कुठलीही टोळी कार्यरत नाही. त्यामुळे नागरिकांनी विशेषत: महिलांनी घाबरु नये, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले आहे. काही तरुणांनी घरात घुसून महिलेची छेड काढल्याची घटना शहरातील विवेकानंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. त्या घटनेचा तपास करण्यात आला असून तीघांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्या अटकेची प्रक्रिया सूरू आहे. यासंदर्भाने केलेल्या चौकशीदरम्यान असे दिसून आले की, कोणत्याही




प्रकारची टोळी बाहेरुन आलेली नाही. स्थानिक टवाळखोर तरुण आहेत. अफवा पसरविण्याकरीता मुद्दाम काही तरुणांनी हातात शस्त्र घेऊन तोंडाला रुमाल बांधून मध्यरात्री विवेकानंद पोलीस ठाण्याच्या हद्दीत फिरण्याचा प्रयत्न केलेला आहे. तिघांना ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. बाहेरुन कोणत्याही प्रकारची टोळी लातूर शहरात आलेली नाही. शहराच्या पुर्वभागामध्ये मोठ्याप्रमाणात पोलिसांची गस्त वाढविण्यात आलेली आहे. अधिक कुमक लावण्यात आलेली आहे, त्यामुळे नागरिकांनी विशेषत: महिलांनी घाबरु नये, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले आहे. शहराच्या पुर्वभागामध्ये विशेषत: गरुड चौक, महादेवनगर, एसओएस, मळवटी रोड आदी परिसरात बाहेरुन आलेली टोळी मध्यरात्री घरात घुसुन महिलांचा विनयभंग करीत आहेत. विशेषत: एक भितीदायक व्यक्ती संपुर्ण अंगाला खाद्य तेल लावून मध्यरात्री घरात घुसतो. धारधार शस्त्राने महिलांच्या अंगावरील कपडे कापून काढतो आणि निघून जातो, अशी अफवा गेल्या आठ दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पसरली. त्यामुळे पोलीस सतर्क झाले होते. शिवाय त्या त्या भागातील काही तरुणांनी रात्रभर जागुन अशा प्रकारचा अपराध करणा–यास पकडण्याचा विढाच उचलला होता. ही अफवा हळूहळू शहराच्या इतर भागापर्यंत पोहोचली होती. त्यामुळे पोलिसांनी मोठ्याप्रमाणात गस्त वाढवून या प्रकरणाचा तपास सुरु केला आहे.

# गोरगरीबांची काळजी करणाऱ्या काँग्रेसला निवडून आणू वैशालीताई विलासराव देशमुख यांचे महिलांना आवाहन

## लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित रेणापूरमधील महिला मेळाव्याला तुडुंब प्रतिसाद

लातूर : विकायला गेलेल्या मालाला बाजारात भाव नाही आणि खरेदी करण्यासाठी म्हणून घ्यायला गेलेला माल स्वस्त नाही. त्यामुळे महिला, शेतकरी, तरुण, व्यापारी सगळेच त्रासले आहेत. अशा अडचणीच्या, महागाईच्या काळातून आपली सुटका करून घेण्यासाठी गोरगरीबांची काळजी करणाऱ्या काँग्रेस पक्षाला म्हणजेच इंडिया आघाडीला आपण निवडून आणू, असे आवाहन विलास कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी शनिवारी (ता. १३) येथे केले.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने रेणापूर येथे रेणापूर तालुका महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित महिला मेळाव्याला वैशालीताई विलासराव देशमुख यांनी संबोधित केले. यावेळी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख, काँग्रेसचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार त्र्यंबक भिसे, महिला काँग्रेसच्या लातूर शहराध्यक्ष स्मिता खानापूरे, लातूर जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्ष शिलाताई पाटील, महिला काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सुनिता आरळीकर, सपना किसवे, अनिता केंद्रे, रेणा साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे आदी उपस्थित होते.



वैशालीताई विलासराव देशमुख म्हणाल्या, आपले नेतृत्व शिवराज पाटील चाकूरकर, शिवाजीराव पाटील निलंगेकर, विलासराव देशमुख, दिलीपराव देशमुख या सर्वांनी आपली काळजी घेतली. आता त्यांच्या पावलावर पाऊल टाकून अमित देशमुख, धिरज देशमुख हे आपली काळजी घेत आहेत. काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणारा पक्ष आहे. येत्या निवडणुकीत आपण काँग्रेसला बळ द्यावे. आपल्याला डॉ. शिवाजी काळगे यांना या निवडणुकीत निवडून आणायचे आहे. त्यांचा प्रचार सर्वांनी असाच उत्स्फूर्तपणे करावा.

आपण गेल्या १० वर्षांत केंद्र सरकारचे काम पाहिले आहे. या काळात महिलांना मोठा त्रास झाला. नोटबंदी केली. विविध घटकांतील महिलांना कितीतरी आश्वासने दिली; पण ती सरकारने पूर्णच केली नाहीत. महागाई वाढवली. शेतीमालाला भाव दिला नाही. दुधाला भाव नाही. सोन्याचे भाव हाताबाहेर गेल्याने गरिबांच्या घरातील लग्नाचा खर्च वाढला आहे. अशा एका अडचणीच्या काळात आपण येऊन उभे आहोत. त्यामुळे आता विचार करून आपल्याला सरकार निवडायचे आहे. अशावेळी काँग्रेस हाच एकमेव पर्याय आहे, असे वैशालीताई विलासराव देशमुख यांनी सांगितले.

आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, काँग्रेस पक्षाने कायमच महिलांना सन्मान देण्याचे, अधिकार देण्याचे, पुरुषांच्या बरोबरीने स्थान देण्याचे काम केले आहे. प्रत्येक कार्यात महिलांना अग्रस्थान देण्याचे काम केले. त्यामुळेच देशाच्या विकासात महिलांचाही मोठा वाटा आहे. म्हणूनच येणाऱ्या ७ मे रोजी महिला, भगिनींनी मोठ्या संख्येने काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना मतदान करावे.

केंद्र सरकारने महागाई भरमसाठ वाढवून ठेवली. नोटबंदी केली. नोकऱ्या दिल्या नाहीत. सुरक्षित वातावरण ठेवले नाही. अशा अनेक निर्णयातून महिलांना त्रास देण्याचे काम या सरकारने केले आहे. सरकारने माय माऊलीचा, नारी शक्तीचा आवाज कधीच ऐकला नाही, असे सांगून आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, काँग्रेसने देश घडवला. भक्कमपणे उभा केला. लोकांना अधिकार दिले. स्वातंत्र्य दिले. लोकशाही जपली. लोकांचा विकास हाच काँग्रेसचा विचार आहे. विकासाची जाहिरात करून विकास होत नाही. भाजप सरकारचा विकास हा चिप्सच्या पॅकेटमधील हवेसारखा पोकळ आहे. गोरगरीब लोकांची पिळवणूक करणाऱ्या केंद्र सरकारला आता हद्दपार करणे गरजेचे आहे.

डॉ. शिवाजी काळगे म्हणाले, आपले नेते राहूल गांधी व इंडिया आघाडीच्या नेत्यांनी महिला सक्षमीकरणासाठी, महिलांना न्याय, हक्क व सुरक्षा मिळवून देण्यासाठी अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. महिलांच्या हितासाठी आपण काँग्रेसला पाठिंबा द्यावा. केंद्र सरकारला आता जनता वैतागली आहे. त्यामुळे सर्वांना आपल्या जबाबदारीची जाणीव निर्माण करून देणारी ही निवडणूक आहे. म्हणून महिलांनी आपले आशीर्वाद आमच्या पाठीवर असू द्यावेत.

याप्रसंगी लालासाहेब चव्हाण, लातूर ग्रामीण मतदारसंघाचे लोकसभा निरीक्षक अनुप शेळके, रेणापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रमोद जाधव, रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, लातूर जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्ष स्वाती सोमाणी, सविता काळगे, रेणापूर तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्ष पूजा इगे, रेणापूर शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्ष निर्मला गायकवाड आदींसह रेणापूर तालुक्यातील काँग्रेस व महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नवगिरे यांनी, सूत्रसंचालन संचिता खोत यांनी, आभार पूजा इगे यांनी मानले.

महिला मेळाव्याला संबोधित करताना वैशालीताई विलासराव देशमुख म्हणाल्या, हा मेळावा संपल्यानंतर आपण घरी जाल तेंव्हा आपल्या घराच्या उजव्या हाताकडील पाच घरात आणि डाव्या हाताकडील पाच घरात जावून आपण काँग्रेसचा देशहिताचा जाहीरनामा, लोकहिताचा विचार पोचवावा. त्यांनाही याच पद्धतीने प्रचार करण्यास सांगावे. अशा पद्धतीने सर्व महिलांनी प्रचार केला तर आपल्याला जिंकायला फार वेळ लागणार नाही. वैशालीताई देशमुख यांनी प्रचाराची सांगितलेली अनोखी ट्रिक ऐकून महिलांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री महेश हिप्परगे

जिल्हाध्यक्ष, लातूर जिल्हा तलाठी संघ
मंडळ अधिकारी कासारखेडा
तहसिल कार्यालय, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री रामराव झाडे

मंडळ अधिकारी, लातूर
तहसिल कार्यालय, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री नागनाथ खंदाडे

मंडळ अधिकारी हरंगुळ खु.
तहसिल कार्यालय, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री रफीक शेख

मंडळ अधिकारी (कन्हेरी)
तहसिल कार्यालय, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री एन. के. केंद्रे

शहरनगर अभियंता,
बांधकाम विभाग, मनपा, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री विजयकुमार चव्हाण

कार्यकारी अभियंता,
पाणीपुरवठा विभाग, मनपा, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री बोधणे प्रणित

तलाठी लातूर-२
वरवंटी, बसवंतपूर
तहसिल कार्यालय, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री एस.व्ही.सागावे

तलाठी लातूर - १
तहसिल कार्यालय, लातूर

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री विलास कतलाकुटे

अध्यक्ष - लातूर तालुका तलाठी संघ
तलाठी सज्जा, कासारगाव लातूर -३
तहसिल कार्यालय, लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री रुक्मानंद वडगावे

रमाई घरकुल, पंतप्रधान आवास योजना,
तथा माहिती व जनसंपर्क अधिकारी
लातूर शहर महानगरपालिका लातूर



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## LK Group of Company's

**Multiple Services**

**Government Authorised Contractor**

- Labour Services (Skilled, Semiskilled, Unskilled)
- Security Guard Service
- Housekeeping and Gardening (Mechanize/Manual)

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन !

## श्री प्रविण बागडे

उपाध्यक्ष, कास्ट्राईब कर्मचारी महासंघ
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान
विद्यापीठ, नागपूर

